| | |
|---|---|
| | नियमित दिवाणी दावा क्र. २८/२०१४ मधील<br>नि.क्र. २२ वरील आदेश<br><br>**सौ. मंगल राजेंद्र परीट (पावसकर) वि. ग्रामपंचायत चंदगड तर्फे ग्रामसेवकसाो, ग्रामपंचायत, चंदगड, वगैरे..** |

प्रस्तुतचा दावा हा निरंतर मनाई आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे. नि.क्र. २२ वरील अर्जाद्वारे वादी हे वादपत्राचे शिर्षकामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागत आहेत. सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ अन्वये दाखल केला आहे. अर्जात नमुद कथन संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे विषद करता येईल. वादी कळवितात की, प्रस्तुत दावा यातील वादी यांनी मौजे चंदगड, ता. चंदगउ येथील विनायकनगर मधील गट नं. ८७१ मधील प्लॉट नं. १ या मिळकतीबाबत दाखल केला असून सदर मिळकतीशी प्रतिवादी नं. १ व २ यांचा काहीही संबंध नसताना ते स्वतः व इतर इसमांना पुढे करून दावा मिळकतीमध्ये वादीस बांधकाम करणेस हरकत व अडथळा करू लागले म्हणून त्यांचेविरूद्ध कायम मनाईची दाद मागितली आहे. असे असता, प्रस्तुतचा दावा दाखल करतेवेळी मौजे चंदगड गावी ग्रामपंचायत अस्तित्वात होती. त्यामुळे चंदगड ग्रामपंचायत तर्फे ग्रामसेवक व सरपंच यांना प्रतिवादी नं. १ व २ म्हणून प्रस्तुत दावेत सामील करून त्यांचेविरूद्ध मनाईची दाद मागितलेली आहे. तथापि, अलीकडे काही दिवसांपूर्वी मौजे चंदगड गावची ग्रामपंचायत ही नगरपंचायत म्हणून अस्तित्वात आली असून तिचा कारभार मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांचेमार्फत चालविला जात आहे. त्यामुळे, प्रस्तुत दावेतुन चंदगड ग्रामपंचायत तर्फे ग्रामसेवक व सरपंच यांना कमी करून त्यांचे ठिकाणी सदर अर्जातील परिच्छेद क्र. ४ प्रतिवादी नं. १ म्हणून नगरपंचायत चंदगड तर्फे मा.मुख्याधिकारीसाो, नगरपंचायत चंदगड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर व प्रतिवादी नं. २ म्हणून मे. नगराध्यक्षसाो, नगरपंचायत चंदगड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर नमुद कथनाप्रमाणे वादपत्राच्या शिर्षकामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. वादी पुढे कथन करतात की, प्रस्तावित दुरुस्तीद्वारे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होणार नाही. तसेच, प्रस्तावित दरुस्तीमुळे दाव्याची चौकशी गुणवत्तेवर होण्यास मदत होणार असून त्यामुळे प्रतिपक्षाचे कोणतेच नुकसान होणार नाही. अर्जास वादी सौ. मंगल राजेंद्र परीट यांच्या शपथपत्राची पुष्टी आहे.

२. अर्जाच्या मागील पृष्ठावर प्रतिवादी यांनी अर्जास खुलासा सादर केला असून त्यांनी अर्जास तीव्र आक्षेप घेतला आहे.

३. वादीतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. एस.आर. पालकर यांचा व प्रतिवादींतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. व्ही.आर. पाटील यांचा युक्तिवाद ऐकला. उभय विधीज्ञांनी त्यांच्या कथनानुसार युक्तीवाद केला.

४. अर्जातील नमुद कथन प्रतिवादींनी जरी नाकारले असले तरी, प्रस्तावित दुरुस्तीचा मजकूर वाद विषयाशी संबंधित व संलग्नित आहे. त्यामुळे, प्रस्तावित दुरुस्ती ही वाद विषयाच्या आशयाशी विसंगत नाही. वादपत्रामध्ये कथनाचा समावेश असतो व त्यात पुराव्याबाबतचे कथन असणे प्रक्रियात्मक कायद्याच्या दृष्टीकोनातून अभिप्रेत नाही. त्यामुळे, प्रस्तावित दुरुस्तीस अनुसरुन केलेल्या कथनांच्या पुष्ठयर्थ वादींनी कोणताही पुरावा दिला नाही हा प्रतिवादी यांचा आक्षेप ग्राह्य मानता येणार नाही. तथापि, वादींनी प्रस्तुत दुरुस्तीचा अर्ज तत्परतेने दाखल केला नाही हे वादींच्या वादपत्रातील कथनांच्या अवलोकनावरुन स्पष्ट होते. त्यामुळे, वादींनी वादपत्र दुरुस्तीचा अर्ज विलंबाने दाखल केला असल्याचे स्पष्ट होते. मात्र याबाबत, प्रतिवादींचा आक्षेप नाही. प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप पाहता ती वाद विषयास अनुसरुन आहे. शिवाय, दाव्याची प्रभावी चौकशी अद्याप सुरु झालेली नाही. त्यामुळे, वादीचा वादपत्र दुरुस्तीचा अर्ज मान्य केल्यास त्यायोगे प्रतिपक्षाचे काहीच नुकसान होणार नाही. याउलट, सदर अर्ज अमान्य केल्यास वाद बाहुल्ल्याची शक्यता आहे. त्यामुळे वादीचा सदर अर्ज मान्य होण्यास पात्र ठरते. परंतु, वादींनी दुरुस्तीची मागणी करण्यास केलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर शास्तीवजा खर्चाची आकारणी करणे आवश्यक ठरते. सबब निम्न आदेश.

## आ दे श

वादीचा नि.क्र. २२ वरील वादपत्र दुरुस्तीचा अर्ज रक्कम रू. १००/- इतक्या रकमेच्या खर्चासह मान्य करण्यात येत आहे. खर्च रक्कम न्यायालयात विधी सेवा समितीकडे जमा करावी.

वादीने या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या आत उपरोक्त प्रमाणे वादपत्रात दुरुस्ती करावी व दुरुस्ती दाव्याची प्रत व त्याच्या पुरेश्या प्रतींसह व हुकूमनाम्यासाठीच्या प्रतीसह अभिलेखावर दाखल करावे.

खर्च रक्कम भरणे ही या आदेशाची पूर्व अट राहील.

स्वाक्षरी/--

दि. २९/०९/२०२१ (अमृत चं. बिराजदार)
चंदगड दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड